**शासकीय कार्यक्रमामध्ये प्लास्टीक, फटाके यांचा वापर टाळणेबाबत तसेच स्टेशनरीचा मोजका वापर करणेबाबत, झाडे लावणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
शासन निर्णय क्रमांक - बैठक-२०१०/६/प्रक्र.१/१०/ता.क.१
दि. ७ जून, २०१०

**प्रस्तावना :-**

ध्वनी प्रदूषणामुळे पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी ध्वनि प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० नुसार कार्यवाही सुरु असून प्लास्टीकच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र विघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) अध्यादेश, २००६ अस्तित्वात आहे. ध्वनि प्रदूषण कमी व्हावे तसेच प्लास्टीकचा वापर कमीतकमी व्हावा यासाठी शासन कटीबध्द असून यासाठी शासनामार्फत वेळोवेळी अनेक उपाय योजना करण्यात येत असतात. मंत्रिमंडळाच्या दिनांक ६ मे, २०१० रोजी झालेल्या बैठकीत त्यावर चर्चा होऊन मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला :-

**शासन निर्णय :-**

अ) शासकीय कामकाजामध्ये प्लास्टिक वेस्टन असलेले पुष्पगुच्छ व बैठकीसाठी पुरविण्यात येणारे प्लास्टिक फोल्डर याचा वापर करण्यात येऊ नये. बैठकीसाठी जास्तीतजास्त पुर्नचक्रीत कागदाच्या फोल्डरचा वापर करावा. तसेच पुष्पगुच्छ ऐवजी एक फुल व झाडाचे रोप देऊन स्वागत करण्यात यावे. या निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २ ऑक्टोबर २०१० पासून करावी.

ब) शासकीय कार्यक्रमांमध्ये फटाक्यांचा वापर सर्वसाधारणपणे टाळण्यात यावा. तथापी, अतिमहत्वाच्या शासकीय कार्यक्रमासाठी शासकीय धोरणाप्रमाणे ध्वनिच्या विहित मर्यादेच्या अधिन राहून परवानगी अनुज्ञेय असेल.

क) शासकीय कार्यालयात स्टेशनरीचा मोजका वापर करावा, जसे :-

१) शासकीय कार्यालयात रिसायकल (Recycled) कागदांचा जास्तीत जास्त वापर करावा.

२) शासकीय कार्यालयात संगणक, प्रिंटर्स स्टँड-बाय मोडमध्ये न ठेवता कार्यालयीन वेळ संपल्यावर बंद करणे बंधनकारक आहे. जेणेकरुन स्टँड-बाय मोडमध्ये असताना होणाऱ्या ऊर्जेचा अपव्यय टाळता येईल.

३) शासकीय कार्यालयांमध्ये यापुढे शक्यतो पाठपोट मुद्रण करु शकणारे प्रिंटर्सचा वापर करावा.

ड) दि. १ जून २०१० पासून शासकीय निवास व कार्यालयीन मोकळया जागेत झाडे लावण्याचा खास कार्यक्रम राबविण्यात यावा.

इ) सर्व शासकीय/निम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळे / शासन अंगिकृत उपक्रम / शासन अनुदानित संस्था / निमशासकीय उद्योग यांनी वरील सुचनांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

ई) सर्व विभागप्रमुखांनी या आदेशाचे तंतोतंत पालन होते आहे किंवा कसे याकडे कृपया जातीने लक्ष द्यावे. तसेच या आदेशाची माहिती आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना करुन देण्याचीही जबाबदारी त्यांची राहील.

उ) या आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याचे अधिकार देखील संबधित विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २१००६०९१३५११५००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ग.नि.वराडे)
संचालक, पर्यावरण विभाग

प्रत,
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव यांचे कार्यालय
अपरमुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (वित्त विभाग)
प्रधान सचिव (नियोजन विभाग)
प्रधान सचिव (गृह)
प्रधान सचिव (उद्योग विभाग)
प्रधान सचिव (कृषि विभाग)
प्रधान सचिव (नगर विकास विभाग)
प्रधान सचिव (उर्जा विभाग)
प्रधान सचिव (पर्यावरण विभाग)
प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग)
प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान विभाग)
सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र -२ नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेदि-१)मुंबई
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
निवडनस्ती

---

एच-११८८ -१अ-